<u>नियमित दिवाणी मुकदमा नं.५५८/२०१७ – निशाणी ४४ लगत आदेश</u>

संभाजी हरिबा बुरूंगले वि. विलास नामु घुटूकडे इ.

CNR No. MHSO20-002201-2017

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.२अ ते २ब व प्रतिवादी क्र.५ यांनी त्यांचे विरुध्द झालेला 'विना कैफियत एकतर्फा' चा आदेश रद्द होऊन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. सदर प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे, प्रतिवादी क्र.२ हे मयत झालेमुळे व वेळेत कागदपत्रे न मिळालेमुळे वेळेत कैफियत व म्हणणे देता आलेले नाही. प्रतिवादी आजरोजी अर्जासोबत कैफियत देत आहे. सदर प्रतिवादी यांचे विरुध्द झालेला एकतर्फा चौकशीचा आदेश रद्द होऊन कैफियत व म्हणणे स्वीकारणे न्यायाचे दृष्टीने जरूरीचे आहे. प्रतिवादींचे म्हणणे व कैफियत नाही स्वीकारणलेस प्रतिवादीला त्याची केस मांडता येणार नाही. त्यामुळे प्रतिवादीचे नुकसान होणार आहे. सबब, अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

२. प्रस्तुत अर्जास वादी यांनी त्यांचे म्हणणे मांडले की, प्रतिवादींचा अर्ज खोटा, लबाडीचा व दिशाभुल करणारा असून वादीस मान्य नाही. प्रतिवादीने मुद्दाम जाणुनबूजून सदर दाव्याचे काम लांबणीवर पडावे या हेतूने व वादीस त्रास देणेचे हेतूने मुदतीत कैफियत दिलेली नाही. अर्जात नमूद केलेले विलंबाचे कारण संयुक्तिक नाही. सबब, अर्ज नामंजूर करणेची विनंती केली.

३. दोन्ही पक्षातर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. दाव्याचे अवलोकन केले असता सदर प्रतिवादी यांनी मुदतीमध्ये दाव्यात हजर राहून कैफियत दिलेली नाही. त्यामुळे त्यांचे विरुध्द 'विना कैफियत एकतर्फा' आदेश झालेला आहे. वादी,

प्रतिवादींचे कथन पाहता व दाव्याचा विषय विचारात घेता दोन्ही पक्षकारांना ऐकण्याची संधी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. सदरचा अर्ज मंजुर केल्याने दाव्याचा विषय गुणदोषावर निर्गत करणेसाठी मदतच होणार आहे. याउलट अर्ज नामंजूर केल्याने प्रक्रियात्मक विलंब वाढणार आहे. अर्ज मंजूर केल्याने वादी यांचे नुकसान होणार नाही. विलंबाचे कारण लक्षात घेता सदर प्रतिवादी क्र.२अ, २ब, ५ यांचेवर खर्च ठेवणे उचित होणार नाही. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो –

<u>आ दे श</u>

१. प्रतिवादी क्र. २अ, २ब, ५ यांचा अर्ज (नि.क्र.४४) मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादी क्र. २अ, २ब, ५ यांचे विरुध्द झालेला 'विना कैफियत एकतर्फा' चा आदेश रद्द करण्यात येतो.

POTDAR BHAGYASHRI MADHUKAR

Digitally signed by POTDAR BHAGYASHRI MADHUKAR
Date: 2024.06.24 12:16:19 +0530

दिनांक – २०/०६/२०२४

( सौ. बी. एम. पोतदार )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, सांगोला.

**<u>C E R T I F I C A T E</u>**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | Shri. S. S. Patne |
| (b) | Court | : | Mrs. B. M. Potdar,<br>Jt. Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C.Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 24/06/2024 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 24/06/2024 |